पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ · Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 20 MAY 2023

## सुधारीत परिपत्रक क्र. - 23 /२०२३

दि.१५ मे २०२३ रोजी माहे मार्च/एप्रिल-२०२३ करीता विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज (Exam forms) भरण्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते. सदरचे परिपत्रक रद्द समजण्यात यावे.

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/प्राचार्या व संचालक/विभागप्रमुख सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १९/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार माहे मार्च/एप्रिल-२०२३ करीता विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज (Exam forms) भरण्यासाठी कोणतेही विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क आकारले जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ मधील ज्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे निकाल जाहिर झालेले आहेत, होत आहेत त्यांनी **माहे मार्च/एप्रिल-२०२३ परीक्षे करीता दि.०३/०६/२०२३ पर्यंत नियमित शुल्कासह परीक्षा फॉर्म भरण्यात यावेत. परीक्षेची पूर्व तयारीची कामे करण्यासाठी किमान १० दिवसाचा कालावधी लागणार असल्याने, विद्यापीठ प्रशासनाची अडचण विचारात घेवून दि.०३/०६/२०२३ पर्यंतच परीक्षा फॉर्म भरुन घेतले जातील. याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

सदरील बाब सर्व संलग्नित महाविद्यालये, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ प्रांगणातील विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी व सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणावी. तरी या परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबींची अत्यंत काटेकोरपणे नोंद घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन परीक्षेच्या कामात विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ. शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सूचना : १. वरील प्रमाणे परीक्षा अर्ज भरण्याच्या तक्त्या मध्ये परीक्षा फॉर्म जमा करण्याची तारीख ही सार्वजनिक सुट्टी, दुसरा शनिवार किंवा चौथा शनिवार असा आलेला असेल तर तो दिवस सोडून पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करावे.

२. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या जाणाऱ्या परीक्षांच्या वेळापत्रकामध्ये केंद्र / महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार अथवा इतर तांत्रिक, प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात येईल, याचे सर्व अधिकार विद्यापीठास आहेत. कृपया याची संबंधितानी नोंद घ्यावी.

जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन /वेळापत्रक/२०२३/1096
दिनांक : 20 MAY 2023

प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव
(०१) मा.प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
(०२) मा.संचालक/विभागप्रमुख, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.